कृपया प्रसिद्धी करिता साहर
संपादक / वृत्तसंपादक

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसुवराडे २९/७/१५
(श्री. मनोज वराडे)
उप. जनसंपर्क अधिकारी

दूरध्वनी क्र. २२८४१२५५/२२८१६६५६. प्रसिद्धी पत्रक क्र. २७
दिनांक : २९/७/२०१५

शनिवार दि.१ ऑगस्ट २०१५ पासून 'बेस्ट'च्या बसप्रवर्तनात होणारे बदल –

मुंबई - शनिवार दि.१ ऑगस्ट २०१५ पासून बेस्ट उपक्रमाच्या बस प्रवर्तनात अनेकविध बदल करण्यात येत आहेत. यामध्ये नवीन बसमार्ग, काही बसमार्गांचा विस्तार, काही बसमार्गांचे परावर्तन करण्यात येत आहे. तसेच ज्या बसमार्गांवर/बसफे-यांवर प्रवासी प्रतिसाद अत्यल्प आहे, अशा बसमार्गांचे / बसफे-यांचे प्रवर्तन रदद करण्यात येत आहे.

नवीन बसमार्ग

१. **बसमार्ग क्र.१५७** – हा बसमार्ग ग्रॅन्ट रोड रेल्वे स्थानक (प) येथून कंबाला हिल टपाल कार्यालय दरम्यान बसमार्ग क्र.१५५ ला घटिवत वर्तुळाकार सेवेत प्रवर्तित करण्यात येईल.

प्रवासमार्ग – **ग्रॅन्ट रोड रेल्वे स्थानक (प)** – नाना चौक - ऑगस्ट क्रांती मैदान – डॉ. गोपाळराव देशमुख मार्ग (पेडर रोड) - जसलोक रुग्णालय – वत्सलाबाई देसाई चौक (हाजीअली) – पं. मदनमोहन मालवीय मार्ग – वसंतराव नाईक चौक (ताडदेव-पांडे कंपाऊंड) - जावजी दादाजी मार्ग – भाटीया रुग्णालय – तुकाराम जावजी मार्ग – नोशिर भरुचा मार्ग - **ग्रॅन्ट रोड रेल्वे स्थानक (प)**

प्रस्थानस्थान -	:	**पहिली बस (वेळ)**	**शेवटची बस (वेळ)**
ग्रॅन्ट रोड रेल्वे स्थानक (प)	:	**७.०५**	**२२.००**

या बसमार्गावरील बसगाडया संपूर्ण आठवडा १० ते १२ मिनिटांच्या प्रस्थानांतराने उपलब्ध आहेत.

२. **बसमार्ग क्र.४३६** – हा बसमार्ग गोरेगांव स्थानक (पूर्व) आणि नागरी निवारा परिषद येथील आय. टी. पार्क दरम्यान वर्तुळाकार सेवेत प्रवर्तित करण्यात येईल.

प्रवासमार्ग – **गोरेगांव स्थानक (पूर्व)** – गोरेगांव चेकनाका – साईबाबा संकुल – दूरदर्शन वसाहत – रॅन इंटरनॅशनल स्कुल – हनुमाननगर – वाघेश्वरी मंदिर – सामना परिवार – संकल्प सोसायटी - इन्फिनिटी

...२...

आय. टी. पार्क – नागरी निवारा विभाग क्र.१ व २ – महापालिका वसाहत – हनुमाननगर – रॅन इंटरनॅशनल स्कुल – दूरदर्शन वसाहत – साईबाबा संकुल - गोरेगांव चेकनाका - **गोरेगांव स्थानक (पूर्व)**

प्रस्थानस्थान -	:	पहिली बस (वेळ)	शेवटची बस (वेळ)
गोरेगांव रेल्वे स्थानक (पूर्व)	:	६.२५	२२.००
नागरी निवारा परिषद	:	६.००	२२.२३

या बसमार्गावरील बसगाडया संपूर्ण आठवडा १५ ते २० मिनिटांच्या प्रस्थानांतराने उपलब्ध आहेत.

३. **बसमार्ग क्र. ६३४** – हा बसमार्ग दामूनगर बसस्थानक, मालाड (पूर्व) आणि मालाड (प) येथील लिंक रोडवरील मालाड आगार दरम्यान प्रवर्तित करण्यात येईल.

प्रवासमार्ग - दामूनगर **बसस्थानक** – अनितानगर - अलकानगर – क्रांतीनगर - गांधीनगर - कुरारगाव – पुष्पा पार्क – मालाड स्थानक (पूर्व-पश्चिम) - चोक्सी रुग्णालय - ऑर्लेम चर्च – मिठ चौकी – लिंक रोड ते **मालाड आगार**

प्रस्थानस्थान -	:	पहिली बस (वेळ)	शेवटची बस (वेळ)
दामूनगर बसस्थानक	:	७.१५	२१.४५
मालाड आगार	:	६.३५	२१.००

या बसमार्गावरील बसगाडया संपूर्ण आठवडा २५ ते ३० मिनिटांच्या प्रस्थानांतराने उपलब्ध आहेत.

४. **बसमार्ग क्र. ६७८** – हा बसमार्ग मानखुर्द स्थानक (प) आणि नानावाडी (मेराज मस्जिद) दरम्यान विठ्ठल नारायण पुरव मार्गावरुन प्रवर्तित करण्यात येईल.

प्रवासमार्ग – **मानखुर्द स्थानक (प)**– विठ्ठल नारायण पुरव मार्ग – चिता कॅम्प – **नानावाडी (मेराज मस्जिद)**

प्रस्थानस्थान -	:	पहिली बस (वेळ)	शेवटची बस (वेळ)
मानखुर्द स्थानक (प)	:	६.१०	२२.१०
नानावाडी (मेराज मस्जिद)	:	६.००	२२.००

या बसमार्गावरील बसगाडया संपूर्ण आठवडा ११ ते १२ मिनिटांच्या प्रस्थानांतराने उपलब्ध आहेत.

बसमार्गांचा विस्तार

१. **बसमार्ग क्र.८४ मर्या.** – पं. पलुस्कर चौक (ऑपेरा हाऊस) आणि अंधेरी स्थानक (प) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचा सोमवार ते शनिवार पं. पलुस्कर चौक येथून हुतात्मा चौकपर्यंत विस्तार करण्यात येत आहे.

२. **बसमार्ग क्र.२१३**– बोरिवली स्थानक (पूर्व) आणि जगरदेव कंपाऊंड दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे प्रवर्तन बोरिवली स्थानक (पूर्व) येथून कस्तुरबा मार्ग क्र.१, टाटा स्पेशल स्टील मार्ग, मागठाणे आगार मार्गे जय महाराष्ट्रनगरपर्यंत विस्तारीत करण्यात येत आहे. यापुढे हा बसमार्ग जय महाराष्ट्रनगर आणि जगरदेव कंपाऊंड दरम्यान बोरिवली स्थानक (पूर्व) मार्गे प्रवर्तित होईल.

३. **बसमार्ग क्र.४६३** – वरळी आगार आणि चेंबूर वसाहत दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे प्रवर्तन चेंबूर वसाहत येथून एमएमआरडीए-वाशीनाका वसाहत दरम्यान रामकृष्ण चेंबूरकर मार्गावरुन विस्तारीत करण्यात येत आहे. यापुढे हा बसमार्ग वरळी आगार आणि एमएमआरडीए-वाशीनाका वसाहत दरम्यान प्रवर्तित करण्यात येईल.

४. **वातानुकूलित बसमार्ग क्र.एएस-९** – डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी चौक आणि घाटकोपर रेल्वे स्थानक (पूर्व) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे घाटकोपर स्थानक (पूर्व) येथून पंतनगर मार्गे घाटकोपर आगारापर्यंत विस्तार करण्यात येत आहे.

बसमार्गांच्या गंतव्यस्थानात बदल

१. **बसमार्ग क्र.६२१** – बोरिवली स्थानक (पूर्व) आणि धीरज उपवन दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे सिध्दार्थनगर व धीरज उपवन दरम्यानचे प्रवर्तन रद्द करुन हा बसमार्ग सिध्दार्थनगर येथून जैन मंदिर, ठाकुर महाविद्यालय मार्गे समतानगर बसस्थानक येथे समाप्त करण्यात येत आहे. यापुढे हा बसमार्ग बोरिवली स्थानक (पूर्व) आणि समतानगर बसस्थानक दरम्यान सिध्दार्थनगर, ठाकुर महाविद्यालय मार्गे प्रवर्तित होईल.

बसमार्गांचे परावर्तन

१. **बसमार्ग क्र.५८** – कुर्ला स्थानक (पूर्व) आणि वडाळा ट्रक टर्मिनल दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे आणिक आगार प्रवेशद्वार व वडाळा ट्रक टर्मिनल दरम्यान वडाळा ट्रक टर्मिनल, भानुशंकर मार्गावरुन असलेले प्रवर्तन सर्व्हिस रोड आणि वडाळा मोनो रेल स्थानक मार्गे परावर्तित करण्यात येत आहे.

२. **बसमार्ग क्र.२४७** – बोरिवली स्थानक (प) आणि प्रगती विद्यालय दरम्यान गोराई खाडी, शिंपोली मार्गे वर्तुळाकार सेवेत प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे शिंपोली दूरध्वनी केंद्र व बोरिवली स्थानक (प) दरम्यान डॉन बॉस्को विद्यालय, बामई नाका मार्गे असलेले प्रवर्तन शिंपोली दूरध्वनी केंद्र येथून शिंपोलीगांव, गोखले विद्यालय, स्वामी विवेकानंद मार्गावरुन परावर्तित करण्यात येत आहे.

३. **बसमार्ग क्र.२९४** - बोरिवली स्थानक (प) आणि प्रगती विद्यालय-गोराई दरम्यान शिंपोली दूरध्वनी केंद्र, गोराई खाडी मार्गे वर्तुळाकार सेवेत प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे बोरिवली स्थानक (प) व शिंपोली दूरध्वनी केंद्र दरम्यान बामई नाका, डॉन बॉस्को विद्यालय मार्गे असलेले प्रवर्तन बोरिवली स्थानक (प) येथून स्वामी विवेकानंद मार्गावरुन गोखले विद्यालय, शिंपोली मार्गावरुन परावर्तित करण्यात येत आहे.

४. **बसमार्ग क्र.३७४ मर्या.** - अणुशक्तीनगर आणि अगरकर चौक, अंधेरी (पूर्व) दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे चेंबूर नाका व कुर्ला आगार दरम्यान सांताक्रुझ-चेंबूर जोडमार्गावरुन असलेले प्रवर्तन राणी लक्ष्मीबाई चौक (सायन), लाल बहादूर शास्त्री मार्गे परावर्तित करण्यात येत आहे.

५. **बसमार्ग क्र.४८५ मर्या.** - घाटकोपर आगार आणि मालाड आगार दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे साकीनाका व ग्रीन फिल्ड दरम्यान एल. ॲन्ड टी.-पवई आणि जोगेश्वरी-विक्रोळी जोडमार्गावरुन असलेले प्रवर्तन मरोळ नाका, मरोळ-मरोशी बसस्थानक, विजयनगर, सीप्झ बसस्थानक, मरोळ एम.आय.डी. सी., मरोळ आगार, महाकाली मार्गावरुन परावर्तित करण्यात येत आहे.

६. **बसमार्ग क्र.४९३ मर्या.** - अणुशक्तीनगर आणि दादलानी पार्क-ठाणे दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे रमाबाईनगर व गोदरेज सोप कंपनी दरम्यान वसंतराव नाईक महामार्गावरुन थेट प्रवर्तित होणारे प्रवर्तन घाटकोपर आगार मार्गे परावर्तित करण्यात येत आहे.

प्रवर्तनात बदल

१. **बसमार्ग क्र.१२०** – पं. पलुस्कर चौक आणि मंगलदास मार्केट दरम्यान वर्तुळाकार सेवेत प्रवर्तित होणारा हा बसमार्ग यापुढे स. का. पाटील उद्यान व मंगलदास मार्केट दरम्यान वर्तुळाकार सेवेत प्रवर्तित करण्यात येईल.

२. **बसमार्ग क्र.२१६** – वांद्रे स्थानक (प) आणि खार स्थानक (प) दरम्यान प्रवर्तित होणारा हा बसमार्ग यापुढे वांद्रे स्थानक (प) येथून च्युईमगांव मार्गे वर्तुळाकार सेवेत प्रवर्तित करण्यात येईल.

३. **बसमार्ग क्र.२१९** – वांद्रे स्थानक (पूर्व) आणि सांताक्रुझ स्थानक (पूर्व) दरम्यान वांद्रे-कुर्ला संकुल मार्गे प्रवर्तित होणा-या या बसमार्गाच्या प्रवर्तनात बदल करण्यात येत असून यापुढे हा बसमार्ग सांताक्रुझ स्थानक (पूर्व) येथून वांद्रे-कुर्ला संकुल येथील डायमंड मार्केट दरम्यान वर्तुळाकार सेवेत प्रवर्तित करण्यात येईल.

४. **बसमार्ग क्र.४८४ मर्या.** – पी.एम.जी.पी. वसाहत, मुलुंड (पूर्व) आणि टिकुजीनीवाडी-ठाणे दरम्यान प्रवर्तित होणारा हा बसमार्ग यापुढे पवारनगर बसस्थानक येथून पी. एन. जी. पी. वसाहत दरम्यान प्रवर्तित करण्यात येईल.

५. **बसमार्ग क्र.७१२ मर्या.** – मागठाणे आगार आणि लक्ष्मी पार्क (मिरा रोड) दरम्यान प्रवर्तित होणारा हा बसमार्ग यापुढे दहिसर बसस्थानक व लक्ष्मी पार्क (मिरा रोड) दरम्यान प्रवर्तित करण्यात येईल.

बसमार्गांचे प्रवर्तन रद्द

१. **बसमार्ग क्र.६१५**– सांताक्रुझ स्थानक (पूर्व) आणि धारावी आगार दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे प्रवर्तन अत्यल्प प्रवासी प्रतिसादामुळे रद्द करण्यात येत आहे.

२. **वातानुकूलित बसमार्ग क्र.एएस-५२५**– दिंडोशी बसस्थानक आणि मिलेनिअम बिझनेस पार्क दरम्यान प्रवर्तित होणा-या या बसमार्गाचे प्रवर्तन अत्यल्प प्रवासी प्रतिसादामुळे रद्द करण्यात येत आहे.

बसमार्गाचे विलिनीकरण

१. **बसमार्ग क्र.२३३ आणि ६९८**– बोरिवली स्थानक (पूर्व) आणि चोगलेनगर दरम्यान प्रवर्तित होणारा बसमार्ग क्र.२३३, बोरिवली स्थानक (पूर्व) व एन. जी. पार्क दरम्यान प्रवर्तित होणाऱ्या बसमार्ग क्र.६९८ मध्ये विलिन करण्यात येत असून यापुढे बसमार्ग क्र.६९८ बोरिवली स्थानक (पूर्व) आणि एन. जी. पार्क दरम्यान चोगलेनगर मार्गे प्रवर्तित करण्यात येईल.

'रविवार' चे प्रवर्तन रद्द

१. **बसमार्ग क्र.७८** – संत गाडगे महाराज चौक (सातरस्ता) आणि माहीम बसस्थानक दरम्यान प्रवर्तित होणाऱ्या या बसमार्गावर **रविवार** रोजी असलेला असमाधानकारक प्रवासी प्रतिसाद विचारात घेऊन 'रविवार' दिवशीचे या बसमार्गाचे प्रवर्तन रद्द करण्यात येत आहे.

२. **बसमार्ग क्र.६२९** – बोरिवली स्थानक (पूर्व) आणि धीरज उपवन दरम्यान प्रवर्तित होणाऱ्या या बसमार्गाचे प्रवर्तन धीरज उपवन ऐवजी सम्रतानगर बसस्थानक येथे समाप्त करण्यात येत असून **रविवार** रोजी या बसमार्गावर असलेला असमाधानकारक प्रवासी प्रतिसाद विचारात घेऊन 'रविवार' दिवशीचे या बसमार्गाचे प्रवर्तन रद्द करण्यात येत आहे.

सर्व प्रवाशांना विनंती करण्यात येते की, त्यांनी बसमार्गातील वरील बदलांची नोंद घ्यावी, आणि आपला प्रवास सुखकर करावा.